REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.2331(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 7 | ISSUE - 7 | APRIL - 2018

# हैद्राबाद स्वातंत्र्य संग्राम आणि आष्टी तालुक्यातील दलित



**डॉ. एम.बी. वाघमारे**
**श्री शिव छत्रपती महाविद्यालय, जुन्नर जि. पुणे**

स्वातंत्र्यपूर्व भारतात जवळपास ५६२ संस्थाने होती. [१] त्यामधील हैद्राबाद एक संस्थान होय. भारतीय संघराज्यात इतर संस्थाने जरी विलीन झली असली तरी हैद्राबाद संस्थान भारतीय संघराज्यात विलीन झाले नव्हते. हैद्राबाद संस्थान आकारमानाने दुसरे तर लोकसंख्येच्या व उत्पन्नाच्या दृष्टीने भारतात पहिले होते. [२] असे हे संस्थान भारतीय संघराज्यात विलीन न झाल्याने भारत देशाच्या अखंडतेलाच तडा जाणार होता. निजाम हा इस्लाम धर्मीय असल्याने त्याचा कल पाकिस्तानकडेच होता. म्हणून स्वतंत्र भारतातील हा भुभाग पारतंत्र्यात होता. हैद्राबाद संस्थानातील जनता स्वातंत्र्याचा तो सुर्य पाहण्यासाठी आसुरलेली होती. त्यासाठी हैद्राबादी जनतेने जो लढा दिला त्यालाच आपण हैद्राबाद स्वातंत्र्य संग्राम असे म्हणतो. या हैद्राबाद स्वातंत्र्य संग्रामात बीड जिल्ह्यातील आष्टी तालुक्यातील दलितांनी देखील आपला सहभाग दाखवला आहे. ते पाहण्याअगोदर आपण हैद्राबादचे निजाम घराणे भारतात कसे आले व त्यांनी हैद्राबादला राज्य कसे स्थान केले ते पाहू.

## दैद्राबाद राज्याची स्थापना :

निझामाचे मुळ घराणे मध्य आशियातील समरकंद बुखारा कडील होय. या घराण्याचा मुळ पुरुष खाजा अबीद अली हा होय. हा शहाजहान बादशहाच्या कारकीर्दीत मक्केच्या यात्रेनिमित्त हिंदुस्थानात आला. शहाजहान याने त्याचा सत्कार करुन त्यांच्या वाटखर्चाची सोय करुन दिली. [३] अबीलद अली मक्केची यात्रा संपवुन परत आला व शहाजानची मर्जी संपादन करुन दिल्लीतच राहिला. त्याने नंतर आपला मुलगा शहाबुद्दीन याला बुखाराहुन बोलावून घेतले. [४] पुढे शहाजहानचा सुप्रसिद्ध वजीन सादुल्लाखान याची मुलगी शहाबुद्दीनला देवुन स्वतःला सुन म्हणून करुन घेतली आणि त्यांच्याच पोटी इ.स. १७६१ मध्ये निजाम उल्-मुल्कचा जन्म झाला. [५]

औरंगजेब बादशहाच्या मृत्यनंतर मोगल सम्राट नेभळट व अकार्यक्षम निघाले. त्याचाच फायदा निजाम-उल्-मुल्क ने घेतला. आपल्या स्वतःच्या पराक्रमाने प्रसिद्धीस आलेल्या निजामाला औरंगजेबाने त्याच्या ह्यातीतच चिनकिलीज-खान ही पदवी दिली होती. याचा अर्थ छोटा तलवार बहाद्दर असा होतो. त्याचे मुळ नाव कमरुद्दीन होते. तो मोठमोठ्यात गणला जावू लागल्याने त्याला मीर असे म्हणून लागले. म्हणून त्याचे नाव पुढे चिनकिलीज-खान मीन कमरुद्दीन झाले. [६] पुढे विजापूरची आदिलशाही संपल्यानंतर तची व्यवस्था लावण्याचे काम कमरुद्दीनकडे दिले. म्हणून त्याला निजाम म्हणून लागले. [७] निजाम म्हणजे व्यवस्थापक, मुक्ल म्हणजे देश, फतेह म्हणजे विजय आणि जंग म्हणले लढाई. हे डोळ्यासमोर ठेवूनच बादशहा फर्रुखसियर याने निजामाला राजकीय निजाम मुल्क-फतेह-जंग हा किताब दिला. लढाईमध्ये विजय मिळवून देशाची व्यवस्था पहाणारा तो निजाम-उल्-मुल्क अशी त्याची प्रसिद्धी झली.

पुढे साखरखेडयाच्या लढाईत विजय मिळाल्याने त्याने बादशहाची दुर्बलता व अस्थीरतेचा फायदा घेतला आणि इ.स.१७२४ मध्ये दक्षिणेत हैद्राबात (भागानगर) येथे स्वतंत्र राज्याची स्थापना केली. [९]

## आर्यसमाज आणि आष्टी तालुका :

स्वामी दयानंद सरस्वती यांनी १० एप्रिल १८७५ रोजी मुंबई येथे आर्य समाजाची स्थापना केली. त्याच्या शाखा सर्व भारतभर पसरत गेल्या. आर्य समाजाने आपल्या वैदिक ज्ञानाने सर्व हिंदु समाजाला एक प्रकारची संजिवनी दिली. त्याची शाखा हैद्राबाद राज्यात मराठवाड्यातील बीड जिल्ह्यातील धारुर येथे १८८० मध्ये पंडीत भगवती प्रसाद, कुंदन प्रसादजी, गोकुळप्रसादजी, मगनलालजी, रामचंद्र भाईजी, माणिकप्रसादजी, बाबुरावजी, गणेश सिंहजी वर्मा व बंशीलालजी तिवारी यांच्या प्रयत्नाने आर्य समाजाची स्थापना झाली. [१०] याच आर्य समाजाने मराठवाड्यातील जनतेचा स्वाभिमान चेतवीला म्हणूनच सरदार वल्लभभाई पटेल यांनी म्हणले आहे की, 'आर्य समाजाने आंदोलनाची पार्श्वभुमी तयार केली नसती तर तीन दिवसात पोलीस कारवाई यशस्वी होणे कठीण होते'.११ निजामी राजवटीचे गुलामगिरीचे जु

झुगारून देण्यासाठी हैद्राबादच्या संस्थानी जनतेने जो तेजस्वी संग्राम दिला, त्यात बीड जिल्ह्याचा मोठा वाटा आहे. याच जिल्ह्यात आर्य समाजाची पहिल्यांदा स्थापना झाली. या जनआंदोलनाचे प्रणेते स्वामी रामानंद तीर्थ यांनी आंबेजोगाई येथुनच लढ्याचे रणशिंग फुंकले. त्यामुळे हैद्राबाद मुक्तीसंग्रामचे उगम स्थान बीड जिल्हा होता असे म्हणटले तर वावगे होणार नाही.

### लढ्याची ठिणगी :

मुक्ती लढ्याचे सत्याग्रह पर्व चालू असताना महाराष्ट्रातील ख्यातनाम संत हरिभक्त कैकाडी महाराज यांना आष्टी तालुक्यात निजामी पोलीसांनी अटक केली. वास्तविक त्यांचा या लढ्याशी काहीच संबंध नव्हता. परंतु किर्तनाला प्रचंड जनसमुदाय जमत असल्याने त्यांना अटक केली. त्यांच्या निषेधार्थ गावोगावी मिरवणुका व निषेध सभा झाल्या त्यामुळे निजामाने त्यांची बिनशर्त सुटका केली. निजामी प्रशासनाचे धाबे दणाणले.[१२] मुक्ती लढ्यासंबंधी जनतेमध्ये जागृती निर्माण झल्यानंतर त्यासंबंधी कार्यक्रमाची आधची करण्यात आली. संस्थानाच्या सरहद्दीवर असणारे करोडगिरी नाके (जकात नाका) याच्यावर हल्ले करणे, दप्तर जाळणे, शिंदीची झाडे नष्ट करणे, पोलीस चौक्यांवर हल्ले करणे. या सारखे नियोजन करण्यात आले. त्यासाठी स्वातंत्र्य सैनिकांनी सरहद्दीवर संघराज्य हद्दीतील केंद्रात आश्रय मिळावा म्हणून केंद्रे स्थापन केली. त्यामध्ये पाथर्डी, कडा, खर्डा, बालमटाकळी, मिरजगांव अशी केंद्र होती.[१३] आष्टी तालुक्यात प्रामुख्याने मिरजगांव, हातवळण या केंद्राचा उल्लेख करता येईल.

### भुमिगत लढ्यासाठी आष्टी तालुका अनुकूल :

आष्टी तालुक्याला पुर्वेला जामखेड, पश्चिमेला नगर व कर्जत तर उत्तरेला पाथर्डी म्हणजे सर्व बाजुंनी नगर जिल्हा आहे. अहमदनगर जिल्हा स्वतंत्र भारतात येत होता. त्यामुळे या तालुक्यात करोडगिरी नाक्यांची (जकात नाका) संख्या बीड जिल्ह्यात सर्वात जास्त होती. साहजिकच निजामाला यामुळे सर्वात जास्त उत्पन्न येथूनच मिळत होते. तालुक्याचा दक्षिणेचा भाग वगळता बाकी सर्व भाग डोंगराळ आहे. त्यामुळे भुमिगत लढ्यासाठी हा तालुका खुपच अनुकूल होता. या तालुक्यात जवळजवळ ८० करोडगिरी नाके होते.[१४]

### निजामकालीन दलित समाजः

निजामकालीन दलितांचे सामाजिक जीवन अत्यंत हालाखीचे होते. पेशवाईत महान-मांगांना केवळ हिंदूच्या गुलामगिरीत राहावे लागत होते. मुस्लिमही हिंदु प्रमाणे दलितांबरोबर अस्पृश्यता पाळत होते.[१५] दलितांना जरी अस्पृश्यतेची वागणुक मिळत होती तरी जीवावर उदार होवून कोणतीही तमा न बाळगता या स्वातंत्र्य लढ्यात प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष भाग घेतला आहे. आणि राष्ट्रीय कार्याला हातभार लावला आहे. म्हणूनच एका स्वातंत्र्य सेध्नकाने म्हटले आहे की, भारतीय स्वातंत्र्य लढ्यात भाग घेणाऱ्या दलितांचे जे प्रमाण असेल त्यापेक्षाही अधिक प्रमाण हैद्राबाद मुक्तीलढ्यात दलितांचे होते.[१६] याला आष्टी तालुकाही अपवाद नाही. येथील दलितांनीही आपापल्या मार्गाने निजामाला विरोध दर्शविला आहे. प्रत्यक्ष लढ्यात भाग घेतला आहे.

आर्य समाजाच्या सामाजिक व धार्मिक कार्यामुळे राज्यातील समाज जागृत होत आहे. त्यामुळे जनतेचे राजकीय चळवळ करण्याच्या अगोदर निजाम सरकारने आर्य समाजावर वक्रदृष्टी फिरवली. आर्य समाजाचा प्रभाव वाढू नये म्हणून त्याच्यावर निर्बंध लादण्यात आले. त्यामुळे आर्य समाजी कार्यकर्त्यांची कोंडी झाली. त्यांनी ही कोंडी फोडण्यासाठी सत्याग्रह सुरु केला. २४ ऑक्टोबर १९३८ ते ७ ऑगस्ट १९३९ पर्यंत अत्यंत सनदशीर व अहिंसा मार्गाने हा लढा चालू ठेवला होता. आर्य समाजाच्या मागण्या पुढीलप्रमाणे सांगता येतील. १) वेगवेगळ्या ठिकाणी आर्य समाजाच्या शाखा स्थापन करण्यास परवानगी असावी. २) आर्य समाजला आपल्या विचारांचा प्रसार करण्याची परवानगी असावी. ३) निजाम सरकारने [१७] आर्य समाज मंदिर, यज्ञ व हवनकुंड उध्वस्त करु नये. ४) कारागृहात हिंदू सैनिकांचे जबरदस्तीचे [१८] धर्मांतर थांबवावे. अशा प्रकारच्या मागण्या मान्य करुन घेण्यासाठी आर्य समाजाने सत्याग्रह करण्याचे ठरविले. या सत्याग्रहात अनेक दलित आर्य समाजाचा सहभाग होता. बीड जिल्ह्यात आष्टी तालुक्यात खरडगव्हाण नावाचे गाव आहे. येथे जयवंता मांग हा शाहीर[१९] होता. तो पोवाडे गाऊन समाज जागृतीचे काम करीत असे. तो आर्य समाजाच्या विचाराने भारावलेला असल्याने रझाकारानांना न घाबरता आपल्या शहीरीतून आर्य समाज सर्वसामान्यांपर्यत पोहचला. कोणत्याही प्रकारचा हिंसक मार्ग न स्विकारता समाजप्रबोधन व समाज संघटनाचे कार्य केले. आष्टी तालुक्यातील कोयाळ येथील भीवा गायकवाड महार[२०] हा देखील आर्य समाजाचा कार्यकर्ता होता. आर्य समाजात अठरा पगड जातीची माणसे कार्यरत होती. म्हणूनच आर्य समाजाचा प्रसार खुप मोठ्या प्रमाणात झालेला होता.

### झेंडा सत्याग्रहात दलितांचा सहभाग :

३ जुलै १९४६ ला सरकारने हैद्राबाद स्टेट कॉंग्रेस वरील बंदी उठवली.[२१] त्यानंतर कॉंग्रेसचे पहिले अधिवेशन हैद्राबाद शहरात मुशीराबाद भागात १६, १७ व १८ जून १९४७ रोजी भरले. या अधिवेशनात ७ ऑगस्ट १९४७ हा दिवस 'संघराज्यात विलीन होण्याचा दिन' [२२] आणि १५ ऑगस्ट १९४७ हा दिवस 'भारतीय संघराज्य दिन'[२३] म्हणून साजरा करण्याचे स्टेट कॉंग्रेसने ठरविले. यावेळी धामणगाव ता. आष्टी,

जि. बीड येथील श्री बापू दौतराव चौधरी यांनी १५ ऑगस्ट १९४७ रोजी आपल्या गावात भारतीय ध्वज फडकवून आपल्यातील स्वातंत्र्यवृत्ती जाला दाखवून दिली. जनतेने भारतीय ध्वजाची संपुर्ण गावातून मिरवणुक काढली. श्री. बापू दौतराव चौधरी हे हातात तिरंग घेवून सर्वांच्या समोर चालत होते. मिरवणूकीत भारत माता की जय, भारतीय ध्वजाचा विजय असो! अशा घोषणा देण्यात आल्या. या सत्याग्राहत पुढील दलितांनी [२४] भाग घेतला होता.

१. गणा कोतवाल २. खंडू मांग ३. बापू चांभार ४. आबाससाणे महार

अशा रितीने प्रत्येक गावातून झेंडा सत्याग्रह झाला. रझाकारांचा दबाव असतानाही कोणत्याही दलिताने धर्मांतर केले नाही. त्यांनी राष्ट्रीय कार्याला वाहून घेतले होते. [२५]

**जंगल सत्याग्रह :**

हैद्राबात स्टेट काँग्रेसच्या समितीने राज्यातील जनतेला ऑगस्ट १९४७ रोजी खेड्यापाड्यातून जंगल सत्याग्रह करण्याचा आदेश दिला. यामध्ये साग, मोह, ताडी, शिंदीची झाडे तोडण्याचा निर्णय घेण्यात आला. निजामाचे पोलीस आणि रझाकार शिंदी पिऊन गावामध्ये जनतेला व शेतकऱ्यांना मारहाण करीत, त्याचप्रमाणे ताडी, मोह, शिंदी या झाडाच्या लिलवापोटी निजाम सरकारला वर्षाला १, ७८, ५७, ९०४ एवढी रक्कम महसुलाच्या रुपाने मिळत असहे. हा महसूल बंद झाला पाहिजे.२६ निजामाचे आर्थिक नुकसान करुन त्याची सत्ता उलथून टाकणे हाच जंगल सत्याग्राहाचा उद्देश होता.

आष्टी तालुक्यातील कोयाळ येथे ९ सप्टेंबर १९४७ रोजी जंगल सत्याग्रह झाला. येथे ताडीची असंख्य झाडे होती. या सत्याग्रहाचे नेतृत्व अंबादास नबाजी लोमटे, बापू धोंडीबा टेकाळे व मारुती गणाजी मुरुमकर यांनी केले होते. या सत्याग्रहात कोयाळ येथील सहाशे लोकांनी सहभाग घेतला होता. यामध्ये जसे पुरुष होते तशा स्त्रियाही होत्या. एकुण १६०० ताडीची झाडे तोडण्यात आली. या सत्याग्रहात भिवा गायकवाड महार, [२७] मंडबाई कान्हू गायकवाड महार या प्रमुख दलिताशिवाय इतरही अनेक दलित स्त्री- पुरुष सहभागी झाले होते. [२८]

त्याचप्रमाणे आष्टी तालुक्यातील बेळगाव व शेरी या ठिकाणी २७ ऑक्टोबर १९४७ रोजी जंगल सत्याग्रह आला. या सत्याग्रहाचे नेत,त्व कोकणे आप्पाभाऊ यांनी केले. यांचे मुळ गाव आष्टी तालुक्यातील चिखली होय. या सत्याग्रहात ११०० लोकांनी सहभाग घेतला होता. जवळपास २४०० ताडीची झाडे तोडण्यात आली. येथील ताडीचे सर्व झाडे तोडून साफ करण्यात आली. यामध्ये दलितांचा खुप मोठ्या प्रमाणात सहभाग होता. नाथु वामन चखाले मांग, सरवान महादू चखाले मांग, बापूराव शिंदे महार, सावळा शिंदे महार, बन्सी गायवाड महार, यासारख्या दलितांनी यामध्ये भाग घेतला होता. [२९] जंगल सत्याग्रहात झाडे तोडण्याचे काम महारच करीत होते. त्यामुळे अशा सत्याग्रहात दलितांचा खुप मोठ्या प्रमाणात सहभाग होता.

**सशस्त्र आंदोलन :**

हैद्राबादच्या स्वातंत्र्यासाठी हैद्राबात स्टेट काँग्रेसने अहिंसात्मक आंदोलन केलेले होते. परंतु निजाम मात्र त्यापुढे झुकलेला नव्हता. उलट सत्याग्रहींवर रझाकार, राहीले, पठाण, अरब पोलीस व लष्कर यांच्या मदतीने निजाम लाठीहल्ला व गोळीबार करीत होता. सत्याग्रहाची चळवळ दडपून टाकण्याचा त्यांचा डाव होता. तेव्हा राज्याच्या सरहद्दीवर लष्करी कॅम्प स्थापून निजामाच्या या धोरणाला जशास तसे उत्तर देण्याचे स्टेट काँग्रेसच्या अहवालानुसार आष्टी तालुक्यातही सरहद्दीवर लष्करी कॅम्पस उभारले आणि निजामाच्या लष्कराशी प्रतिकार चालू ठेवला. यामध्ये दलितांचाही वाटा होता.

यांसारख्या कित्येक दलितांनी सशस्त्र लढ्यामध्ये भाग घेतला आहे. परंतु त्यांची नोंदणी होवू शकली नाही. कॅम्पला भरपूर माणसे असल्याने कोण कोणत्या जातीचा आहे हे माहीत नव्हते. मुलाखत घेतघ्लेल्या स्वातंत्र्य सैनिकांनी आपल्याला माहित असलेल्या स्वातंत्र्यसैनिकांची नावे सांगितली आहेत.

याशिवाय गुप्तहेर व खबरे म्हणूनही दलितांनी खुप मोठी कामगिरी बजावली आहे.

धामणगाव परिसरातील गणा कोतवाल, खंडू मांग, बाळू चांभार व आबा ससाणे महार हे मिरजगाव कॅम्पवर गुप्तहेराचे काम करीत होते. [३०] वरणवाडीतील काही स्त्रिया देखील गुप्तहेराचे काम करीत होत्या. ठाकुबाई व सुंदराबाई ह्या त्यापैकीच एक होय. सुंदराबाई फारच धाडसी होती. तीला रझाकारही घाबरत असत. त्यामुळेच तिला नागवी बाई म्हणत. [३१] कोयाळ या ठिकाणच्या मंडाबाई कान्हू गायकवाड ही महार बाई पहाडासारखी होती. कोयाळमध्ये पाच-सहा रझाकार आले तेव्हा या बाईने त्यांच्याशी झटापट केली. रझाकार त्यामुळे घाबरले व पळून गेले. [३२]

**चिखलीच्या रझाकार कॅम्पवर हल्ला :**

आष्टी तालुक्यातील चिखली या ठिकाणी रझाकारचा कॅम्प होता. या कॅम्पवर स्वातंत्र्यसैथ्नकांनी ७ ऑक्टोंबर १९४७ रोजी हल्ला चढविला. मिरजगाव कॅम्पमधील स्वातंत्र्यसैनिकांनी हा हल्ला केला होता. यामध्ये अप्पा खेडकर, आसराजी जगताप, विठ्ठल नवले, किनीचे सर्जेराव पाटील, शंकर चांभार याशिवाय अनेक सैनिकांनी हल्ला चढविला होता.[३३] परंतु स्वातंत्र्य सैनिकांच्या हाती काहीच लागले नाही. म्हणून पुढे घुमरपिंपरी व शिराळा येथेही रझाकारांवर सैनिकांनी हल्ला केला.

**करोडगिरी नाक्यावरील हल्ले :**

निजामाच्या राज्यातील करोडगिरी नाका म्हणजे जकात नाका होय. हे करोडगिरी नाके सरहद्दीवर असत. या ठिकाणी जकात घेतली हात असे. त्यामुळे तेथे पैसा असे. तेव्हा हे करोडगिरी नाके उध्वस्त करणे हा हैद्राबाद स्वातंत्र्य संग्रामाचाच एक भाग होता. हैद्राबात स्टेट कॉग्रेसने राज्याच्या सरहद्दीवर असलेल्या आपल्या लष्करी कॅम्पला करोडगिरी नाके उध्वस्त करण्याचे आदेश दिले. त्यानुसार स्वातंत्र्य सैनिकांनी करोडहिगरी नाके उध्वस्त केले.

बीड जिल्ह्यातील आष्टी तालुक्याती सांगवी आष्टी येथील बाबुराव बापुराव कांबळे चांभार, बाळू केरु सावंत महार, दुर्गा साधू महार, दाजी डाडर मांग व शम्सुद्दीन शेख यांनी आपल्या सहकाऱ्यांना घेवून चिखली, घुमरपिंपरी, शिराळा, टाकळशिंगी येथील आसराजी जगताप यांच्या नेतृत्वाखाली तेथील रझाकार केंद्रावर व नागलवाडीच्या करोडगिरी नाक्यावर हल्ला केला. टाकळशिंगी व चिखलीच्या थैल्या लुटल्या. नागलवाडीचा करोडगिरी नाका उध्वस्त केला. तेथील दप्तरही जाहले.[३४] हातवळण कॅम्पमधील सैनिकांनी वाघळूज येथील रझाकाराची चौकी जाळली. पिंपळी व लोणी येथील रझाकारांची केंद्र उध्वस्त केली. या चकमकीत खुशाबा निमसे शहीद झाले. टाकळी चौधरी या ठिकाणीही रझ ाकारांबरोबर चकमक झाली. त्यामध्ये बनपिंपरी ता. अहमदनगरचे हरिभाऊ जगताप मारले गेले. या मोहिमेमध्ये धोंडीबा कान्होबा थोरवे, विठ्ठल काळोखे मांग, जयवंता काळोखे मांग, शंकर उदमाले चांभार, खरड गव्हाणचा शेख चंदुभाई सुलतानभाई यांनी भागत घेतला होता.[३५]

आष्टी तालुक्याच्या सरहद्दीवर असणारा मिरजगाव कॅम्प होता. या कॅम्पमधील सैनिकांनी रझाकारांच्या अनेक केंद्रावर हल्ले केले. करोडगिरी नाके उध्वस्त केले. कोयाळ, लोणी, साकत, खुंटेकर, पिंपळा, वाघळूज, टाकळशिंगी या ठिकाणाचे नाके जाळले, उध्वस्त केले, काही लुटले. या मोहिमेत वामन महार, रंगा महार, शिरपा महार, लक्ष्मण नेटके चांभार, गणपत नेटके चांभार, रंगा नेटके चांभार यांनी भाग घेतला. यांचे नेतृत्व आसराजी जगताप यांनी केले होते. वाकीचा नाका उध्वस्त केला. यावेळी रझाकारांशी चकमक झाली, त्यामध्ये मोर्हनुद्दीन हा मुसलमान ठार झाला. ताडीची झाडे तोडून ताडी व दारु बंदी देखील केली.[३६] या सगळ्या स्वातंत्र्यसैनिकांना विश्वनाथ अजबे, आसराजी जगताप यांचे मार्गदर्शन लाभले. चिंचोंडी पाटील येथील थैली लुटून आणली तेव्हा मिरगावाच्या महारांनी खुप सहकार्य केले. त्यांनी आम्हाला सांभाळले. मिरगावच्या परसराम महार, सोना मंग, जनार्दन ढोर यांनी आम्ळाला खुप सांभाळले. करोडगिरी नाके लुटताना देखील ही मंडळी आमच्याबरोबर असायची.[३७]

अशा रितीने आम्ही एकमेकाला सहकार्य करुन आष्टी तालुक्यात या निजामाचा सळो की पळो करुन सोडले.

निजामाची शरणागती :

निजाम सहजासहजी वठणीवर येत नाही हे पाहून भारत सरकारने १३ सप्टेंबर १९४८ रोजी हैद्राबाद संस्थानावर पोलीस कारवाई करण्यास सुरुवात केली. याचे मुख्य संचालक लेफ्टनंट जनरल राजेंद्र सिंहजी होते. भारतीय सैन्यापुढे निजाम तग धरु शकला नाही. १७ सप्टेंबर १९४८ रोजी निजामाने शरणागती पत्करली. या पोलीस कारवाईच्या काळात अहमदनगर येथील महार रेजीमेंटच्या शूर सैनिकांनी मेजर ठाकूर सिन्हा बंधू यांच्या नेतृत्वाखाली बीड जिल्ह्यात फार मोलाची कामगिरी पार पाडली.[३८]

अशा रितीने हैद्राबाद संस्थान भारतात विलीन झाले. या लढ्यात आष्टी तालुक्यानेही भाग घेतला होता. त्यामध्ये अठरापगड जातीची माणे होती हे आपणांस विसरता येत नाही.

संदर्भ

१. जोशी दपं (संपा) काळाच्या पडद्याआड, खंड ३ हैद्राबाद, मराठी साहित्य परिषद, १९९२ पृ.३
२. चपळगावकर नरेंद्र-कर्मयोगी संन्यासी - मुंबई, मौज प्रकाशन, १९९९ पृ.२
३. पगडी सेतू माधवराव- महार आणि मराठे पुणे, जोशी आणि लोखंडे कंपनी १९६३, पृ.९१-९२.
४. अनंत भालेराव, हैद्राबाद स्वातंत्र्य संग्राम आणि मराठा, मंबई, मौज प्रकाशन २००१. पृ.२.
५. सेतू माधवराव पुर्वोक्त पृ.९१.
६. कुरुंदकर नरहर - हैद्राबाद विमोचन आणि विसर्जन, औरंगाबाद, रजत प्रकाशन १९९८, पृ.१६७
७. कुरुंदकर नरहर - पुर्वोक्त पृ, १६७
८. काटे पी.व्ही. - मराठवाडा अंडर दी निजांम, दिल्ली मित्तल प्रका.१९८७ पृ.१०
९. डॉ. कठारे अनिल / डॉ. यनगराळे एन.एन. मराठवाड्याचा इतिहास, नांदेड, कल्पना प्रकाशन १९९९ पृ२०९.

१०. डॉ. कठारे अनिल / डॉ. नगराळे एन.एन. पुर्वोक्त पृ.२१२
११. राठोर शामलाल, मुक्तीसंग्राम मे. नांदेड, ज्योती प्रकाशन १९७६ पृ.१.
१२. खोत श्रीनिवास व विर्धे दिगंगर, बीड जिल्ह्यातील स्वातंत्र लढा, मुंबई, ऑगस्ट क्रांती सुवर्ण महोत्सव समिती, १९९८, प,७३.
१३. खोत श्रीनिवास व विर्धे दिगंबर - पुर्वोक्त पृ, ७४
१४. खोत श्रीनिवास व विर्धे दिगंबर - पुर्वोक्त पृ, ७६
१५. डॉ. कठारे अनिल, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि हैद्राबादचा स्वातंत्र्य संगाम, नांदेड कल्पना प्रकाशन, १९९ पृ.१३.
१६. डॉ. कठारे अनिल - मराठेकालिन पाटील, कंधार, पुनम प्रका. १९९६ पृ.२८
१७. राठोर श्यामलाल उपरोक्त पृ.१६
१८. कठोर / नगराळे उपरोक्त पृ.७६
१९. निलाखे माधव पंढरीनाथ, सोलापूरवाडी, ता. आष्टी, प्रत्यक्ष मुलाखत, २३ ऑक्टोबर २००३.
२०. दरेकर नाथुजी विठोबा, कोयाळ, ता. आष्टी, प्रत्यक्ष मुलाखत, २३ ऑक्टोबर २००३.
२१. देऊळगावकर वि.पां., संपा. स्वामी रामानंद तीर्थ यांची दैनंदिनी, मुंबई, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्क़ती मंडळ, सप्टेंबर, २००१ प,.२५.
२२. देऊळगांवकर वि.पां. (संपा.) हैद्राबात सवातंत्र्य संग्रामाच्या आठवणी, मुंबई पॉप्युलर प्रका. १९७६ पृ.१८६.
२३. भालेराव अनंत, पुर्वोक्त पृ.२८९.
२४. चौधरी बापू दौलतराव, धामणगाव, ता. आष्टी, प्रत्यक्ष मलाखत दि. २५ ऑक्टोंबर २००३, उपरोक्त
25. Dengale B.S. Hyderabad Freedom Struggle, Nanded, Kalpana Prakashan, 1998 Page 196.
२६. दरेकर नाथुजी विठोबा, उपरोक्त
२७. आमटे अंबादास नबाजी, कोयाळ ता आष्टी, प्रत्यक्ष मुलाखत दि. २५ ऑक्टोबर २००३.
२८. कोकणे आप्पा भाऊ चिखली, ता. आष्टी, प्रत्यक्ष मुलाखत दि. २४ ऑक्टोंबर २००३
२९. चौधरी बापू दौलतराव, धामणगाव, ता. आष्टी, प्रत्यक्ष मुलाखत दि. २५ ऑम्टोंबर २००३
३०. उपरोक्त
३१. आमटे अंबादास नबाजी, उपरोक्त
३२. खेडकर शंकर चंद्रभान, उपरोक्त
३३. कांबळे बापुराव बाबुराव, उपरोक्त
३४. थोरवे धोंडीबा कान्होबा, उपरोक्त
३५. जगताप आसराजी रावजी, उपरोक्त
३६. पाचपुते साहेबराव गोविंदराव, उपरोक्त
३७. अनिल कठारे, मराठेकालीन पाटील, पुनम प्रकाशन कंधार, १९९६ पृ,.३७.